# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि १४ जुलै २०२३

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४५/२०२३ भादवि ३८० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/७/२०२३ रोजी १४.०० वा ते १४.३० वा चे दरम्यान फिर्यादीच घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०७/२०२३ रोजी २२.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिमा राहुल सुत्रावे,वय-४६ वर्षे,रा- ७००,उत्तर कसबा बाळीवेस मल्लिकार्जुन मंदिर जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २१,५००/- रूपये त्यात एक काळया रंगाचा सॅमसंग ए ३२ मोबाईल व रोख रक्कम व लेदर बॅग जुवाकिअ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १३/०७/२०२३ रोजी १४.०० वा ते १४.३० वाच्या दरम्यान यातील फिर्यादी हि राहते घरी असताना फ्रीजला अडकवलेली नमुद लेदर पर्स मोबाईल व रोख रक्कम चाव्या व इतर वस्तु असे कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करून फिर्यादीचे वरील वर्णनाचे साहित्य फिर्यादीचे संमतीवाचून मुददाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून. तपासः - पोह/१३६/चौगुले- ७२१८५३९१५० |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६०/२०२३ भादवि ३२४,३३६,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०७/२०२३ रोजी २२.४५ वा. चे सुमारास शोभादेवी नगर शोएब पटेल यांचे घराचे मागे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०७/२०२३ रोजी २३.३१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | निसार सलीम सय्यद,वय-२२ वर्षे,रा- २७९,रा- राजीव गांधी नगर शांती नगर रोड मंजरेवाडी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अल्ताफ पेशमाम २) अझहर पेशमाम ३) फैय्याज रा- शोभादेवी नगर सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १२/०७/२०२३ रोजी २२.४५ वा.च्या सुमारास यातील फिर्यादी व त्याचा मित्र साहिल मुजावर असे कुमठा नाका जवळील पेट्रोल पंप येथे पेट्रोल भरण्याकरीता जात असताना नमुद ठिकाणी आलो असता त्या ठिकाणी फिर्यादीचे ओळखीचे यातील नमुद आरोपी मजकूर हे बाकडयावर बसले होत त्यापैकी आरोपी क्र १ हा फिर्यादी जवळ येवून तु आमच्या गल्लीत आला कशाला असे म्हणून शिवीगाळ करून येथून पुढे आमच्या गल्लीत जायचे नाही अशी दमदाटी करून अरोपीतांनी मिळून फिर्यादीस हाताने मारहाण केली तसेच आरोपी क्र २ याने तेथे रोडच्या कडेला पडलेला दगड त्याचे उजव्या हातात घेवून फिर्यादीचे डोक्यात फेकून मारून जखमी केले आहे.म्हणून. तपासः - पोह/९३४/नवले- ९४२३९९२५३२ |

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६२/२०२३ भादवि ३८५,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २७/०५/२०२३ रोजी ११.३० वा ते १२.०० वा चे दरम्यान महिला तक्रार निवारण कक्ष आवारात सोलापूर शहर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १३/०७/२०२३ रोजी १९.१० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मोहित दत्तात्रय गायकवाड,वय-२८ वर्षे,रा- हब्बु वस्ती देगाव नाका सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) महिमा (पत्नी),२) अनुप्रिया शिवशरण (सासू),३) शेषा सर्जेराव थोरात (आज्जी सासू),४) दत्ता मोरे ,५) सुजाता वाघमारे. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २७/०५/२०२३ रोजी ११.३० ते १२.०० वा चे दरम्यान यातील फिर्यादीने दिलेल्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने समुपदेशनासाठी नमुद ठिकाणी फिर्यादी हे त्याचे कुटुबासह गेले असता तेथे यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी सर्वजण मिळून |

| | | |
|---|---|---|
| | | फिर्यादीचे कुटुंबीयाना शिवीगाळ करून दमदाटी करून आरोपी क्र २, ४ ,५ यांनी फिर्यादीस तु जर आमच्या लग्नात व दवाखान्यासाठी झालेले खर्चाचे पाच लाख रूपये दिले तरच तुझ्याबरोबर तुझी पत्नी महिमा व मुलाला नांदविण्यास पाठवतो अन्यथा तुला तुझ्या मुलाचे तोंड सुध्दा बघु देणार नाही आम्ही तुला जगु देखील देणार नाही तुझ्या आई वडीलांना जिवंत ठेवणार नाही व माझ्या मुलील तुझ्या व तुझ्या घराबारावर गुन्हा दाखल करायला लावते गपचुप आम्हास पाच लाख रूपये दया अशी धमकी देवून फिर्यादीचे अंगावर धावून गेले म्हणून. तपासः - पोसई डोंगरे- ९६५७७२३८०८ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३९८/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १३/०७/२०२१ ते दि १८/०८/२०२२ रोजीपर्यत फिर्यादीचे सासरी बालाजी नगर मंगळवेढा |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १३/०७/२०२३ रोजी २०.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | कोमल विश्वास पवार,वय-२३ वर्षे,रा- सी/९१,वृदांवन सोसायटी आरटीओ ऑफिसजवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) विश्वास पवार (पती), २) चांदुबाई पवार (सासू), ३) गणपती पवार (सासरे),सर्व रा- बालाजी नगर ता-मंगळवेढा जि.सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १३/०७/२०२१ ते दि १८/०८/२०२२ रोजीपर्यत फिर्यादीचे सासरी बालाजी नगर मंगळवेढा येथे वरील आरोपीत मिळून फिर्यादीस माहेरून सोने व पैसे आण असे म्हणून सतत घालून पाडून बोलणे शिवीगाळ,माराहण ,सतत अपमान, घरातील कामे एकटीला करावयास लावणे,खोटेनाटे आरोप करणे असे करून फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ केलेला आहे.म्हणून. तपासः-मपोह/९५२/गायकवाड- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४६३/२०२३ भादवि १४१,१४२,१४३,१४६,१४७,१४९,३२३,३२४,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १३/०७/२०२३ रोजी १५.३० वा चे सुमारास काजळे यांच्या दुकानासमोर जुना विडी घरकुल सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १४/०७/२०२३ रोजी ०६.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | मोहन नागनाथ साळुंखे,वय-३८ वर्षे,रा- घरनं २४१,सग्गम नगर सिफा बेकरी समोर जुना विडी घरकुल सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अजय शिवशरण,२) खंडेराव काजळे, ३) लखन काजळे, ४) शिवा अक्की,५) सोबतचे तीन मुले (नाव व पत्ता माहित नाही) |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १३/०७/२०२३ रोजी १५.३० वा चे सुमारास काजळे यांच्या दुकानासमोर जुना विडी घरकुल सोलापूर येथून फिर्यादी ,फिर्यादीचा मामा, व मित्र असे सर्वजण मिळून जात असताना काजळे यांच्या दुकानातील कामगार आरोपी क्र १ याने का बघतो म्हणून फिर्यादीसोबत वाद केल्याने त्याने त्याचा मालक खंडेराव काजळे याला सांगितल्याने त्याने व त्याचा भाऊ लखन काजळे असे सर्वानी शिवीगाळ करून लाथाबुक्यांने व प्लॉस्टिक पाईपने मारहाण केली होती त्यात फिर्यादीस चक्कर येत असल्याने फिर्यादी पाणी पिण्यास जात असताना यातील आरोपी क्र ४ यांस फिर्यादीचा धक्का लागल्याने त्याने फिर्यादीस शिवीगाळ करून मी काय चिज आहे हे दाखवतो असे दमदाटी करून त्याने व त्याच्या सोबतच्या तीन अनोळखी मुले नाव माहित नाही असे सर्वानी मिळून लाथाबुक्याने मारहाण करून आरोपी क्र ४ यांने त्यांच्या हातातील कडयाने फिर्यादीच्या डोक्यात बुक्या मारून जखमी केले आहे म्हणून तपास- पोनि माने- **८१०८६७५०५०** |